नवभारत

ऑगस्ट २०१३

- वंचितांची लावण्य अक्षरे
- महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे योगदान
- सरबजितसिंगच्या निमित्ताने
- ग्रेस यांच्या दोन कविता : 'डोळे' आणि 'दुपार'
- जैनेंद्रिय संज्ञा : एक तौलनिक अध्ययन
- कुसुमाग्रजांच्या पुतळाविषयक कविता : एक चिंतन

प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई संचालित मासिक

नवभारत

वर्ष ६६। अंक ११। ऑगस्ट २०१३
आषाढ/श्रावण शके १९३५
वार्षिक वर्गणी ३०० रुपये
या अंकाची किंमत रु. २०/-

नवभारतची भूमिका*

मानवाच्या व मानवसंस्कृतीच्या विकासास व उन्नतीस पोषक होईल अशा प्रकारे महाराष्ट्रीय जीवनाचा व संस्कृतीचा विकास करणे, हे या मासिकाचे ध्येय व उद्दिष्ट आहे.

ध्येयप्रवण व्यक्तींनी स्वोन्नतीच्या हेतुपूर्तीसाठी जे आपले सांस्कृतिक मूल्यमापन ठरविलेले असेल, उच्च वातावरणातील जो अभिजात अनुभव स्वतःच्या साधनेने संग्रहीत केलेला असेल, त्याचे दिग्दर्शन हेच संस्कृतिपोषक वाङ्मय होऊ शकते, असा संचालक व संपादक-मंडळ यांचा विश्वास आहे.

या मासिकात येणाऱ्या लेखांत कोणत्याही विशिष्ट मताचा, वादाचा, पक्षाचा किंवा पंथाचा प्रचार करण्याचा हेतू नाही.

संचालक व संपादक-मंडळातील सर्व व्यक्ती यांचेही सर्व विषयांत मतैक्य आहे, असे नाही. मानवी जीवनविषयक व सांस्कृतिक मूल्यांसंबंधी सदृश अशा दृष्टिकोणानेच त्यांना एकत्र आणले आहे. तथापि प्रत्येकाचे व्यक्तिवैशिष्ट्य व विचारस्वातंत्र्य यांचा विनाश न होता विकास व्हावा, या दृष्टीनेच त्यांचे सहकार्य राहील. प्रत्येक व्यक्ती आपल्या नावाने प्रसिद्ध होणाऱ्या लेखाबद्दलच जबाबदार राहील.

मासिकात प्रसिद्ध होणाऱ्या प्रत्येक लिखाणात सत्यनिष्ठा, संयम आणि सहिष्णुता असतील, अशी काळजी घेतली जाईल.

*नवभारत, ऑक्टोबर १९४७, वर्ष १ ले, अंक १ मधील कै. शंकरराव देव यांच्या 'संचालकांचे मनोगत' मधून.

संपादकीय पत्रव्यवहार :
संपादक, *नवभारत* मासिक,
द्वारा : प्राज्ञपाठशाळा मंडळ,
वाई - ४१२८०३ (जि. सातारा).
फोन : (०२०) २५६७४०९३.

व्यवस्थापकीय पत्रव्यवहार :
घ. वा. जोशी
व्यवस्थापक, नवभारत मासिक
द्वारा : प्राज्ञपाठशाळा मंडळ, ३१५, गंगापुरी,
वाई - ४१२८०३ (जि. सातारा)
फोन : (०२१६७) २२०००६.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाला अनुदान दिले असले, तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य-शासन सहमत असेलच, असे नाही.

नवभारत

ऑगस्ट २०१३

अनुक्रमणिका

जैनेंद्रीय संज्ञा : एक तौलनिक अध्ययन

नीलेश जोशी

प्रास्ताविक :

संस्कृत साहित्यामध्ये व्याकरणशास्त्राला अग्रस्थानी मानले जाते. साधुशब्दांचे ज्ञान या शास्त्राद्वारे होत असते. हे व्याकरणशास्त्राचे महत्त्व जाणून त्याचा संबंध वेदांशी लावला गेला आणि षड्वेदांगांमध्ये व्याकरणाला स्थान मिळाले. एवढेच नव्हे, तर व्याकरणास वेदाचे मुख मानले आहे.

"वेदस्य मुखं व्याकरणं स्मृतम्[1]।"

तर महाभाष्यकार पतंजलींनी व्याकरणास 'अपरा विद्या' म्हणून संबोधले आहे.[2] त्यामुळेच सहाही वेदांमध्ये व्याकरणास प्रधान मानले जाते.[3] अशा या व्याकरणाचा मूळ संस्कर्ता म्हणून इंद्राचा उल्लेख तैत्तिरीय संहितेत आढळतो.

"ते देवा इन्द्रमब्रुवन्, इमां नो वाचं व्याकुर्विति
तामिन्द्रो मध्यतोऽवक्रम्य व्याकरोत्।[4]"

यावरून स्पष्ट होते की, इंद्राने वाणीचे प्रकृति, प्रत्यय इत्यादी विभागांत विश्लेषण केले. इंद्राने चालविलेल्या या संप्रदायास 'ऐन्द्र संप्रदाय' म्हणून मान्यता मिळाली. याच्याशी अनेक प्राचीन प्रातिशाख्य ग्रंथ संबंधित होते. याचबरोबर समांतर असा दुसराही एक 'माहेश्वर संप्रदाय' होता. याच्याशी महर्षी पाणिनींचा संबंध असून 'अष्टाध्यायी' हा त्यांचा प्रसिद्ध व्याकरणग्रंथ माहेश्वर सूत्रांवर आधारभूत आहे, हे सर्वांना ठाऊकच आहे.

स्वतः महर्षी पाणिनींनी अष्टाध्यायीमध्ये पूर्ववर्ती १० वैयाकरण आचार्यांच्या मताचा नामनिर्देशपूर्वक स्वीकार केला. त्याच परंपरेनुसार पाणिनींनंतरच्या काळातही व्याकरण व त्याचे स्वरूप विकसित होत राहिले आणि अर्वाचीन व्याकरणग्रंथांवर पाणिनीय व्याकरणाचा स्पष्ट प्रभाव दिसतो, त्यामध्ये कातंत्र व्याकरण, चांद्रव्याकरण, जैनेंद्र व्याकरण, जैन शाकटायन व्याकरण, सरस्वतीकंठाभरण, हैमशब्दानुशासन सारस्वत व्याकरण, जौमर व्याकरण, मुग्धबोध व्याकरण यांचा समावेश होतो.

जैनेंद्र व्याकरण :

महर्षी पाणिनींनी कृत्रिम संज्ञांचा वापर करून व्याकरणशास्त्रात लाघव-गौरव प्रस्थापित करून सूत्ररचनेचा परमोत्कर्ष केला. याच परंपरेचे अनुकरण करीत उत्तरवर्ती जैनेंद्र व्याकरण असे एक व्याकरण आहे; ज्यामध्ये अनेक कृत्रिम संज्ञांचा मोठ्या प्रमाणात वापर केलेला आढळतो. म्हणून येथे तुलनेसाठी जैनेंद्रीय व्याकरणाचा स्वीकार केला आहे.

श्रवणबेळगोळच्या शिलालेखातील उल्लेखानुसार आचार्य देवनंदी किंवा पूज्यपाद जिनेंद्रबुद्धी यांनी 'जैनेन्द्रव्याकरणम्' नामक व्याकरणाची रचना केली.[1] जिनेंद्रबुद्धी यांनी रचलेले व्याकरण म्हणून त्यास 'जैनेंद्र व्याकरण' म्हणतात.

जैनेंद्र व्याकरणाचे उपलब्ध पाठ :

या व्याकरणाचे आज दोन पाठभेद उपलब्ध होतात.

१) औचित्य लघुपाठ - अभयनंदीकृत 'महावृत्ति' सहित.

२) दाक्षिणात्य बृहत्पाठ - गुणनंदीकृत 'शब्दार्णव' सहित.

वरीलपैकी अभयनंदीकृत महावृत्तिसहित जैनेंद्र व्याकरणाचा लघुपाठ अधिक प्रामाणिक मानला जातो. येथे तुलना करताना आम्हीही हाच लघुपाठ स्वीकारलेला आहे. जैनेंद्रीय व्याकरणात अनेक कृत्रिम संज्ञा वापरल्या आहेत, त्यांवरील पाणिनीय व्याकरणाचा प्रभाव आणि काही नवीन संज्ञा या सर्वांचा अभ्यास करण्याचा मुख्य उद्देश आहे.

जैनेंद्रीय संज्ञा :

शास्त्रामध्ये काही विशिष्ट सांकेतिक अर्थाने जे

---

१. पा. शि. ४२

२. म. भाष्य १।२।३२

३. म. भाष्य १।१

४. तै. सं. ६।४।७।३

---

१. श्रवणबेळगोळ शिलालेख श्लो. क्र. २,३

शब्द वापरले जातात, त्यांना 'संज्ञा' असे म्हणतात. त्यानुसार जैनेंद्र व्याकरणात या शास्त्राचे विशिष्ट संकेत सांगणाऱ्या संज्ञा वापरण्यात आलेल्या आहेत, त्या पुढीलप्रमाणे -

कोष्टक क्र. १

स्वम्	एप्	जि	इत्	अधिकरण	द्वि	स	कृत्
स्फ	दि	खम्	मु	कर्म	बहु	ह	ण्य
ङ.	नि	उप्	सु	कर्ता	विभक्ति	घम्	सत्
मृत्	भु	उज्	धि	गि	वा	[illegible]	हत्
प्र	त	उस्	रु	ति	इप्	[illegible]	द्वि
दी	खु	टि	गु	मम्	भा	बन्	थ
प	ङि.	उङ्.	पदम्	त	[illegible]	द्वन्द्व	च
उदात्त	ध	दु	भ	अस्मद	[illegible]	दु	
अनुदात्त	संख्या	झि	अपादान	[illegible]	[illegible]	[illegible]	एकूण
स्वरित	इल्	धु	संप्रदान	[illegible]	[illegible]	[illegible]	८४
ऐप्	सर्वनाम	धि	करण	[illegible]	[illegible]	[illegible]	

अशा प्रकारे जैनेंद्र व्याकरणात एकूण ८४ संज्ञा योजण्यात आलेल्या आहेत. या संज्ञांचे चार विभागांत वर्गीकरण करता येते, ते असे -

१) स्वीकृत पाणिनीय संज्ञा

२) पाणिनीयतुल्य जैनेंद्रीय संज्ञा

३) केवळ जैनेंद्रीय संज्ञा

४) सविशेष जैनेंद्रीय संज्ञा

या चार प्रकारांमध्ये विभागणी करून जैनेंद्रीय संज्ञांचा तौलनिक अभ्यास करता येईल.

१) स्वीकृत पाणिनीय संज्ञा -

जैनेंद्रीय संज्ञांमध्ये अशा काही संज्ञा आढळतात, ज्या पाणिनीय व्याकरणातून जशाच्या तशा स्वीकारण्यात आलेल्या आहेत; पण त्यांचा अर्थबोध करवून देणारी संज्ञासूत्रे मात्र वेगळी आहेत. अशा संज्ञांना 'स्वीकृत पाणिनीय संज्ञा' अंतर्गत समाविष्ट केले आहे. अशा स्वीकृत पाणिनीय संज्ञा एकूण १९ आहेत. त्यांतील काही संज्ञा पुढे देत आहे.-

कोष्टक क्र.२

अ.क्र	संज्ञा	जैनेंद्रीयसूत्र क्रम	पाणिनीयसूत्र क्रम
१	उदात्त	जै.व्या.१।१।१३	पा.सू.१।२।२९
२	अनुदात्त	जै.व्या.१।१।१३	पा.सू.१।२।३०
३	स्वरित	जै.व्या.१।१।१४	पा.सू.१।२।३१
४	सर्वनाम	जै.व्या.१।१।३५	पा.सू.१।१।२७
५	टि	जै.व्या.१।१।६५	पा.सू.१।१।६४
६	पदम्	जै.व्या.१।२।१०३	पा.सू.१।४।१४
७	भ	जै.व्या.१।२।१०७	पा.सू.१।४।१८
८	अपादान	जै.व्या.१।२।११०	पा.सू.१।४।२४
९	द्वन्द्व	जै.व्या.१।३।९२	पा.सू.२।२।२९
१०	कृत्	जै.व्या.२।१।८०	पा.सू.३।१।९३

येथे 'उदात्त'[१] या संज्ञेपासून 'विभक्ति'[२] या संज्ञेपर्यंतच्या १६ संज्ञा पाणिनीय व्याकरणातील पहिल्या अध्यायातून घेण्यात आलेल्या आहेत. शिवाय जैनेंद्र व्याकरणामध्ये या संज्ञा प्रथमअध्यायातच सांगितल्या आहेत. जैनेंद्र व्याकरणातील 'द्वन्द्व' ही एकच संज्ञा अशी आहे, जी समासाचे रूढ नाम निर्देशित करते; अन्यथा तत्पुरुषादिक सर्व समासांना नवीन कृत्रिम संज्ञा देण्यात आलेल्या आहेत. तसेच जैनेंद्र व्याकरणातही 'कारके'[३] असे अधिकार-सूत्र करून पाणिनीय क्रमाने कारक-प्रकरण उक्त आहे. यावरून पाणिनीय व्याकरणाच्या प्रभावाचा अंदाज येऊ शकतो.

२) पाणिनीयतुल्य जैनेंद्रीय संज्ञा -

ज्या संज्ञा केवळ जैनेंद्रीय व्याकरणातच आहेत; पण त्यांचे कार्य मात्र पाणिनीय संज्ञांसारखे आहे, अशा संज्ञांचा विचार 'पाणिनीयतुल्य जैनेंद्रीय संज्ञा' या विभागात केला आहे. या संज्ञा जैनेंद्रीय व्याकरणाचे वैशिष्ट्य मानल्या जाऊ शकतात. या संज्ञांची एकूण संख्या ४७ आहे. येथे तुलनेसाठी काही संज्ञा उद्धृत करीत आहे-

---

१. जै. व्या. १।१।१३ - पा. सू. १।२।२९

२. जै. व्या. १।२।१५७ - पा. सू. १।४।१०४

३. जै. व्या. १।२।१०९ - पा. सू. १।४।२३

कोष्टक क्र.३

अ.क्र.	जैनेंद्रीय संज्ञा	-	पाणिनीय संज्ञा
१	स्वम् (जै.व्या. १।१।२)	-	सवर्णम् (पा.सू.१।१।९)
२	स्फ(जै.व्या. १।१।३)	-	संयोग: (पा.सू.१।१।१७)
३	ङ.(जै.व्या. १।१।४)	-	अनुनासिकम् (पा.सू.१।१।८)
४	मृत्(जै.व्या. १।१।५)	-	प्रातिपदिकम्(पा.सू.१।२।४५)
५	प्र(जै.व्या. १।१।११)	-	ऱ्हस्व: (पा.सू.१।२।२७)
६	नि(जै.व्या. १।१।२२)	-	निपात: (पा.सू.१।१।१४)
७	भु(जै.व्या. १।१।२७)	-	वृ (पा.सू.१।१।२०)

उपरोक्त संज्ञा आणि इतर जैनेंद्रीय संज्ञा या पाणिनीय संज्ञांहून भिन्न तर आहेतच; पण या संज्ञांचे खास वैशिष्ट्य म्हणजे या सर्व अल्पाक्षर आहेत. जैनेंद्र व्याकरणकारांनी सूत्रलाघवासाठीच इतक्या अल्पाक्षर संज्ञा बनविल्या आहेत, असेच यावरून म्हणावे लागेल. तसेच पाणिनीय संज्ञांमध्ये जेथे निपात-उपधा-धातु-गुरु-एकवचन- द्विवचन असे प्रयोग आहेत, तेथे काही अक्षरांचा लोप करून अनुक्रमे नि[१]-उङ्[२]-धु[३]-रु[४]-एक[५]-द्वि[६] अशा अल्पाक्षर संज्ञा बनविल्या आहेत. तरीही त्या जैनेंद्रीय संज्ञा म्हणून मान्यता पावण्यास योग्य आहेत.

३) केवळ जैनेंद्रीय संज्ञा -

ज्या संज्ञा केवळ जैनेंद्रीय व्याकरणातच आढळतात, पाणिनीय व्याकरणात आढळत नाहीत, अशा या संज्ञांचा समावेश 'केवळ जैनेंद्रीय संज्ञा' या प्रकारात केला आहे. अशा एकूण ४ संज्ञा आहेत. -

अ.क्र.	जैनेंद्रीय संज्ञा	प्रसिद्ध अर्थ
१	खु (जै.व्या. १।१।२९)	संज्ञा
२	डि. (जै.व्या. १।१।३०)	भावकर्म
३	धि (जै.व्या. १।२।२)	अकर्मक धातू
४	द्यु (जै.व्या. १।३।१०५)	उत्तरपद

१ जै. व्या. १।१।२२ - पा. सू. १।१।१४
२ जै. व्या. १।१।६६ - पा. सू. १।१।६५
३ जै. व्या. १।२।१ - पा. सू. १।३।१
४ जै. व्या. १।२।१०० - पा. सू. १।४।११
५ जै. व्या. १।२।१५५ - पा. सू. १।४।१०२
६ जै. व्या. १।२।१५५ - पा. सू. १।४।१०२

वरील चारही संज्ञा पाणिनीय व्याकरणात आढळत नाहीत, हे स्पष्ट आहेच, त्यामुळे या संज्ञा जैनेंद्रीय व्याकरणाचे वैशिष्ट्य असून या कृत्रिम संज्ञांमुळे सूत्रलाघव घडला आहे. उदा.- डै.त । जै.व्या.१।२।७ या सूत्राने 'डि.' पुढे असताना म्हणजे भावे व कर्मणी प्रयोगात प्रयोगात 'द' म्हणजे आत्मनेपदी प्रत्यय होतात. हे सूत्र भावकर्मणो: । पा.सू.१।३।१३ सूत्राशी तुल्य आहे. तरी जैनेंद्रीय सूत्र अधिक लघुतम हे मानावेच लागेल.

४) सविशेष जैनेंद्रीय संज्ञा -

जैनेंद्रीय व्याकरणकारांनी व्याकरणशास्त्रात रूढ असलेल्या शब्दांनादेखील कृत्रिम संज्ञा दिल्या आहेत. त्यांना 'सविशेष जैनेंद्रीय संज्ञा' म्हटले आहे. या संज्ञांचे दोन उपप्रकार पडतात.

१) सामासिक संज्ञा
२) विभक्तिक संज्ञा
यांची उदाहरणे पुढीलप्रमाणे -

४.१) सामासिक संज्ञा -

कोष्टक क्र.५

अ.क्र	जैनेंद्रीय संज्ञा	-	पाणिनीय संज्ञा
१	स (जै.व्या.१।३।२)	-	समास (पा.सू.२।१।३)
२	ह (जै.व्या.१।३।४)	-	अव्ययीभाव (पा.सू.२।१।३)
३	षम् (जै.व्या.१।३।१९)	-	तत्पुरुष (पा.सू.२।१।२२)
४	य (जै.व्या.१।३।४४	-	कर्मधारय (पा.सू.१।२।४२)
५	र (जै.व्या.१।३।४७)	-	द्विगु (पा.सू.२।१।५२)
६	बम् (जै.व्या.१।३।८६)	-	बहुव्रीही (पा.सू.२।२।२४)

४.२) विभक्तिक संज्ञा -

कोष्टक क्र.६

अ. क्र	जैनेंद्रीय संज्ञा	प्रसिद्ध अर्थ
१	वा (जै.व्या.१।२।१५८)	प्रथमा
२	इप् (जै.व्या.१।२।१५८)	द्वितीया
३	भा (जै.व्या.१।२।१५८)	तृतीया
४	अप्(जै.व्या.१।२।१५८)	चतुर्थी
५	का (जै.व्या.१।२।१५८)	पंचमी
६	ता (जै.व्या.१।२।१५८)	षष्ठी
७	ईप् (जै.व्या.१।२।१५८)	सप्तमी
८	बोध्य (जै.व्या.१।२।१५८)	संबोधन

येथे स्पष्ट होते की, सामासिक संज्ञांमध्ये सर्व समासांना संज्ञा तर दिलेल्या आहेतच; पण 'समास' या शब्दासही संज्ञा दिली आहे. सूत्रलाघव हेच कारण समोर येते. उदा.- अव्ययीभावो शरत्प्रभृतिभ्यः। पा.सू.५५।४।१०७ या पाणिनीय सूत्राच्या तुलनेत हे शरदादेः। जै.व्या. ४।२।१०९ हे जैनेंद्रीय सूत्र अल्पाक्षर आहे. हीच गोष्ट विभक्तींबाबतदेखील म्हणावी लागेल. उदा.- पञ्चमी भयेन। पा.सू.२।१।३७ या पाणिनीय सूत्रापेक्षा का भीभिः। जै. व्या. १।३।३२ जैनेंद्रीय सूत्र अधिक लहान आहे.

संज्ञाकरणाचा परिणाम -

पूर्वी स्पष्ट केल्याप्रमाणे जैनेंद्रीय व्याकरणात ८४ संज्ञा वापरण्यात आलेल्या आहेत. या संज्ञाकरणाचा परिणाम असा की, सूत्रामध्ये मोठ्या प्रमाणात लघुता आलेली आहे. त्यामुळे जैनेंद्रीय व्याकरण पाणिनीय रचनेपेक्षा कमी प्रयासात कंठस्थ करता येईल, हे नक्की.

दुसरा परिणाम हा मात्र दुष्परिणाम वाटतो. कारण जैनेंद्रीय व्याकरणात रूढ शब्दांनादेखील संज्ञा योजल्यामुळे अर्थसंदिग्धता निर्माण होते. अल्पाक्षरत्व, सारवत्त्व, विश्वतोमुख, अस्तोभत्व, अनवद्यत्व ही पाचही सूत्रलक्षणे जैनेंदीय व्याकरणास तंतोतंत लागू पडतात. पण असंदिग्धता मात्र नाही; कारण अत्यंत अल्पाक्षर कृत्रिम संज्ञा वापरल्या आहेत. उदा., भुस्थोः। जै.व्या.१।१।९१ या सूत्रात 'भु' ही कृत्रिम संज्ञा आहे; पण 'स्था' धातूच्या सान्निध्यात उच्चारल्यामुळे तो धातू वाटण्याची शक्यता आहे. किंवा चात्। जै. व्या. ५।२।६० या सूत्रात च+आत् असा विग्रह असून येथे 'च' हे अव्यय नसून अभ्यस्त संज्ञा आहे, त्यामुळे येथे संदेह निर्माण होतो. अशी अनेक उदाहरणे देता येतील, पण विस्तारभयास्तव येथेच विराम घेऊ.

सारांश -

थोडक्यात असे सांगता येईल की, जैनेंद्रीय व्याकरणात स्वीकृत पाणिनीयसंज्ञा १९, पाणिनीयतुल्य जैनेंद्रीय संज्ञा ४७. केवळ जैनेंद्रीय संज्ञा ०४, सविशेष जैनेंद्रीय संज्ञा १४ अशा एकूण ८४ संज्ञा योजण्यात आलेल्या आहेत. या संज्ञा खूपच अल्पाक्षर आहेत. त्यामुळे सूत्रे लघुतम झाली; पण अर्थाच्या बाबतीत मात्र संदिग्धता निर्माण होते. तरीसुद्धा जैनेंद्रीय व्याकरण पाणिनीय व्याकरणाच्या प्रभावाने युक्त असूनही स्वतंत्र आहेच. शिवाय जैनेंद्रीय संज्ञा मुखोद्‌गत झाल्याशिवाय जैनेंद्रीय व्याकरणाचा श्रीगणेशाच होऊ शकत नाही, हे नक्की.

संदर्भसूची ग्रंथ -

१) जैनेन्द्रव्याकरणम्, आचार्य - अभयनन्दिप्रणीता जैनेन्द्रमहावृत्तिः, सम्पादक : पं.शम्भुनाथ त्रिपाठी, पं. महादेव चतुर्वेदी, प्रकाशक : भारतीय ज्ञानपीठ, काशी, नोव्हेंबर १९५६

२) अष्टाध्यायी, परच्छेदवृत्तिवार्त्तिकटिप्पणीसहिता, सम्पादक : श्रीगोपालदत्त पांडेय, प्रकाशक : चोखंबा सुरभारती प्रकाशन, वाराणसी, सन २००८

३) "Ashtadhyayi of Panini" edited & transleted into English, by Vasu S.C., Vol-I & II, Publication - Motilal Banarasidas, Delhi. 1962

४) व्याकरण महाभाष्य, मूळ व मराठी भाषांतर, भाषांतरकार म.म.वासुदेवशास्त्री अभ्यंकर, संपादक - का.वा.अभ्यंकर, प्रकाशक - डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे - १९५१-१९५३, भाग- १-६

५) पाणिनीय शिक्षा, विस्तृत हिंदी व्याख्या सहित, संपादक : विद्यासागर डॉ.दामोदर महतो, प्रकाशक : मोतीलाल बनारसी दास, दिल्ली, २००२

★★★